# उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे यांचे कार्यालय

राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सूरीश्वरजी (भवन) एम.बी.एम.सी.बिल्डींग
शांती गार्डन, रामनगर, मिरारोड (पुर्व) ४०११०७.

☎ २८४५४३६१

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/ठाणे ता./बी-१/ किंग पॅलेस
हौ/कलम ८८/अंशत:बदल/ ४०९१ /सन २०१७
दिनांक :- १९/०१/२०१७

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये आदेश.

२) या कार्यालयाचा जा.क्र.उपनि/ठाणे ता/बी-६/किंग पॅलेस/हौ/क.८३/ सन ०५, दि.२४/१०/०८.

३) या कार्यालयाचा जा.क्र.उपनि/ठाणे ता/बी-१/चौकशी अधि./क.८३/२८९२/ सन १०, दि.२७/०१/१०.

४) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दिनांक २६/१२/२०१३ रोजीचे आदेश.

५) श्री आर. के. भास्कर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड तालुका तथा चौकशी अधिकारी यांनी कलम ८३ अन्वये दि. २१/०८/२०१५ रोजी दाखल केलेला चौकशी अहवाल.

६) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयें दिनांक २९/०१/२०१६ रोजीचे आदेश.

७) श्री बी. आर. मगदुम, सेवा निवृत्त, सहाय्यक निबंधक तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचे दिनांक १२/०६/२०१६ रोजीचे पत्र.

८) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वयें दिनांक २७/०७/२०१६ रोजीचे आदेश.

९) मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे यांचे कार्यालयाकडील ज़ा.क्र. जिउनि/ ठाणे/बी-६/चौ.अधि.नियुक्ती रद्द/६४३/सन २०१७, दिनांक १७०१/२०१७ रोजीचे पत्र.

१०) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

---

ज्याअर्थी, किंग पॅलेस को-ऑप.हौसिंग सोसा.लि., मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ९ अन्वये नोदणीकृत गृहनिर्माण संस्था असून सदर संस्था या कार्यालयाचे कार्यक्षेत्रात कार्यरत आहे, आणि,

ज्याअर्थी, ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वयें नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी यांनी त्यांचेकडील अहवालात सुचविल्याप्रमाणे संबंधित मुद्यांवर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यासाठी या कार्यालयाने उक्त वाचावे क्र. ८ अन्वयें दिनांक २७/०७/२०१६ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश पारीत करुन श्री.दिपक खांडेकर, सहाय्यक निबंधक, यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली होती. परंतु उक्त वाचले क्र. ९ अन्वयें मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,ठाणे यांचे कार्यालयाने दिनांक १७/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वयें श्री.दिपक खांडेकर, सहाय्यक निबंधक , यांचेऐवजी अन्य प्राधिकृत चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत या कार्यालयास सुचित केलेले आहे. आणि,

ज्याअर्थी, मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,ठाणे यांचे कार्यालयाकडील आदेशास अनुसरुन श्री.दिपक खांडेकर, सहाय्यक निबंधक यांचेऐवजी अन्य प्राधिकृत चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणे क्रमप्राप्त झाले असल्याचे, माझे मत झाल्याने मी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

Scanned by CamScanner

# -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, दिनेश चंदेल, उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे असा आदेश देत आहे की, किंग पॅलेस को-ऑप.हौसिंग सोसा.लि., मिरारोड (पुर्व) ता. जि. ठाणे या संस्थेच्या गैरव्यवहाराची व जबाबदारी निश्चित करण्यासाठी परिशिष्ट अ प्रमाणे चौकशी करणेकामी या कार्यालयाने उक्त वाचले क्र. ८ अन्वयें दिनांक २७/०७/२०१६ रोजीचे आदेशात अंशत:बदल करुन श्री.दिपक खांडेकर, सहाय्यक निबंधक तथा प्राधिकृत चौकशी अधिकारी यांचेऐवजी श्री. विनायक आर. साखरे, सेवानिवृत्त विभागीय सहनिबंधक (लेखापरीक्षण) यांची कलम ८८ खाली प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

त्यांनी चौकशी करुन तीन महिन्यांचे आंत चौकशी अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश माझे आज दिनांक १९/०१/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह देत आहे.

सहकारी संस्था ठाणे तालुका यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

ठिकाण :- मिरारोड, ठाणे
दिनांक :- १९/०१/२०१७

(दिनेश चंदेल)
उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे.

Scanned by CamScanner